महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र. प्रतिनि २५१९/प्र.क्र. १२२/१४-अ,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४१७२
दिनांक : ०४ सप्टेंबर, २०१९

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "कार्यासन अधिकारी /अधिक्षक" हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ:- १) सा.प्र.वि. शा.नि. क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का. १२, दिनांक १७-१२-२०१६

२) सा.प्र.वि., शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२०/१४, दिनांक ३१-८-२०१७

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा क्र. मजीप्रा -११९९/प्र.क्र.११७/ पा.पु. २३, यांचा दिनांक १४-०८-२०१९ चा प्रस्ताव.

महोदय/महोदया,

सा.प्र.वि. शा.नि. क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का. १२, दिनांक १७-१२-२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, संदर्भ क्र.२ येथील दिनांक ३१-८-२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदरहू कार्यपध्दतीस अनुसरुन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्त्याखालील **मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या, मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई** येथील "कार्यासन अधिकारी/अधिक्षक" चे **१ रिक्त पद**{वेतनश्रेणी रु.९३००-३४८००-ग्रेड पे ४३००/ (७ व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-१४: ३८६००-१२२८००)} मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून भरण्याबाबत संदर्भाधिन क्रमांक ३ येथील प्रस्तावान्वये विनंती केली आहे. त्यास अनुसरुन खालील तक्त्यातील स्तंभ क्र.२ येथील पदावर मंत्रालयीन संवर्गातील सहायक कक्ष अधिकाऱ्यांकडून सदरहू पद **१ वर्षाकरिता** प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता इच्छुकता मागविण्यात येत आहे :-

अ.क.	**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवीमुंबई या कार्यालयातील पदनाम**	**वेतनस्तर**	**मंत्रालयीन संवर्गातील पदनाम**
१	२	३	४
१.	कार्यासन अधिकारी/ अधिक्षक	एस-१४: ३८६००--१२२८००	सहायक कक्ष अधिकारी

२. उपरोक्त पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरिता इच्छुक मंत्रालयीन विभागातील, सहायक कक्ष अधिकारी यांनी आपल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे अर्ज सादर करावा. कोणत्याही परिस्थितीत या विभागाकडे थेट अर्ज करु नयेत तसेच प्रत देखील अंकीत करु नये, थेट प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

३. सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी इच्छुक कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्जांची छाननी करुन खालील माहितीसह आपल्या विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने इच्छुक कर्मचाऱ्याचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव खालील माहितीसह या कार्यासनाकडे दिनांक १३-०९-२०१९ पर्यंत पोहोचेल अशारीतीने (नोंदणी शाखेत पाठवू नये) पाठवावा:-

१)	कर्मचाऱ्याचे संपूर्ण नांव व पदनाम	
२)	जन्मदिनांक	
३)	सेवानिवृत्तीचा दिनांक (पहा शा.नि.दिनांक १७-१२-२०१६ मधील तरतुद ५ (ब) (६)	
४)	शैक्षणिक अर्हता	
५)	शासन सेवेत प्रथम नियुक्तीचा दिनांक	
६)	भ्रमणध्वनी क्रमांक	
७)	मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत)	
८)	मत्ता व दायित्व सादर केली आहेत का ? (दि.३१.३.२०१९ रोजीचे)	
९)	५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का ? (लागू असल्यास)	
१०)	संबंधित कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास त्याबाबतचा तपशील (पद, ठिकाण व कालावधी)	
११)	संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे काय?	

४. एकदा निवड झालेल्या कर्मचाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, आपल्या विभागातून सदर पदावर प्रतिनियुक्तीसाठी जाण्यास कोणीही कर्मचारी इच्छुक नसल्यास तसेही कृपया दिनांक १३-०९-२०१९ पर्यंत या विभागास कळविण्यात यावे.

५. सद्य:स्थितीत शासनाने सरळसेवा भरतीवर निर्बंध घातले असल्याने, प्रतिनियुक्तीने रिक्त होणाऱ्या पदावर तत्काळ कर्मचारी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. तथापि, सरळसेवा, मविप व पदोन्नतीमधून ज्या प्रमाणात उमेदवार उपलब्ध होतील त्या प्रमाणात विभागातील रिक्त पदांच्या टक्केवारीनुसार विभागास, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येतील याची विभागांनी नोंद घ्यावी.

६. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात येत आहे.

७. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०९०४१२३७२९९६०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.09.04 12:45:21 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: कार्यासन अधिकारी/अधिक्षक पदाच्या कर्तव्य व जबाबदारी याबाबतचा तपशील

प्रत :-

१) मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, दक्षिण कक्ष, २रा मजला, बेलापूर, नवी मुंबई. यांना माहितीस्तव सादर.

२) उप सचिव (पा.पु.-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता, गो.ते. रुग्णालय इमारत आवार, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४००००१

३) सा.प्र.वि./१४-अ (संग्रहार्थ)

कार्यासन अधिकारी/अधिक्षक पदाच्या कर्तव्य व जबाबदारी याबाबतचा तपशील

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयात अधिकारी/ कर्मचारी यांच्या विभागीय चौकशी व अनुषंगिक प्रकरणे या विषयांबाबत कार्यवाही करणे.

२) प्रधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून मध्यवर्ती कार्यालयाकडे मार्गदर्शनासाठी प्राप्त होणाऱ्या शिस्तभंग विषयक बाबींवर कार्यवाही करुन अंतिमत: निर्णय देणे.

३) मा. सदस्य सचिव व मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामकाज पहाणे.